DLSA Nashik

सत्यमेव जयते

District Mediation Monitoring Committee Nashik

# DISTRICT LEGAL SERVICES AUTHORITY, NASHIK
# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नाशिक

जावक क्रमांक/जि.वि.से.प्रा./ २०२५ /२०२६ दिनांक : ०४ /०८/२०२६

## कंत्राटी लेखापाल एक पद करार पध्दतीने भरणेबाबत जाहीरात

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,नाशिक कार्यालयाकरीता लेखापाल (Accountant) संवर्गातील एक (०१) रिक्त पद हे करार पध्दतीने ११ महिन्यांच्या कालावधीसाठी भरण्यात येणार आहे. सदर पदाकरिता पात्र व इच्छुक उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज आवश्यक कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रतीसह सीलबंद लिफाफयात जाहिरात प्रसिध्द दिनांक ४/८/२०२६ पासून ते दिनांक १२/८/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपावेतो नमुद पत्त्यावर कार्यालयीन वेळेत सादर करावेत. मुदतीनंतर प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.

### पदाचा तपशील

| अ. क्र. | पदनाम | रिक्त पद संख्या | भरती पध्दत | कालावधी | मासिक मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | लेखापाल (तात्पुरत्या स्वरुपाचे) | ०१ | करार पध्दत (तात्पुरत्या स्वरुपाचे) | ११ महिने | ४०,००० |

**शैक्षणीक व इतर पात्रता**

१. उमेदवार वाणिज्य किंवा कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.

२. इंग्रजी, मराठी टंकलेखनाचे ज्ञान असावे.

एमएस.सीआयटी./डी.ओ.ई.अे.सी.सी./आय.टी.आय. संगणक डिप्लोमा यापैकी एकाचे ज्ञान असावे.

३. PFMS/ MS Office/Excel Word चे उत्तम ज्ञान असणे आवश्यक.

४. GST, TDS, PF, ESI रिटर्न भरण्याचा अनुभव असाल्यास प्राधान्य.

५. किमान २ वर्षे लेखा क्षेत्रातील अनुभव असल्यास प्राधान्य.

६. मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक.

**वयोमर्यादा**

अर्जाच्या अंतिम दिनांकास उमेदवाराचे वय १८ वर्षा पेक्षा जास्त असावे. शासकीय सेवेमधून सेवा निवृत्त कर्मचा-यास अनुभवाचे आधारे प्राधान्य.

**आवश्यक कागदपत्रे**

१. अर्जाचा विहित नमुना

२. जन्मतारीख पुरावा/शाळा सोडल्याचा दाखला/इयत्ता १० वी शालांत प्रमाणपत्र

३. शैक्षणीक पात्रतेचे प्रमाणपत्रे

४. अनुभव प्रमाणपत्र

५. आधार कार्ड /इतर ओळखपत्र

६. रहिवासी दाखला

७. पासपोर्ट आकाराचे दोन अलीकडील फोटो

८. पोलिस पडताळणी प्रमाणपत्र व वैदयकीय प्रमाणपत्र(निवड झाल्याचे तारखेपासून २महिन्याचे आत सादर करावे.)

९. चारित्र्य प्रमाणपत्र (गॅझेटेड अधिकारी / सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले)

**निवड प्रक्रिया**

१. अर्जाची छाननी करण्यात येईल.

२. पात्र उमेदवारास मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल.

३. निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

<u>अटी व शर्ती</u>

१. सदर नियुक्ती पुर्णत: तात्पुरती व करार पध्दतीवरील असेल.

२. नियुक्त उमेदवारास शासन सेवकाचा दर्जा प्राप्त होणार नाही.

३. करार कालावधी संपल्यानंतर नियुक्ती आपोआप समाप्त होईल.

४. निवड झालेल्या उमेदवारास नियुक्तीचे २ महिन्याचे आत पोलिस पडताळणी अहवाल सादर करणे आवश्यक राहील.

५. उमेदवाराने चारित्र्य प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

६. उमेदवाराविरुध्द कोणताही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल असल्यास उमेदवारी रदद् करण्यात होउ शकते.

७. नियुक्त झालेल्या उमेदवाराच्या चारित्रयाबाबत वर्तणुकीबाबत अथवा त्याच्या विरुध्द कोणतीही प्रतिकुल बाब आढळून आल्यास तसेच सेवेत, निष्काळजीपणा गैरवर्तन किंवा कर्तव्यात कसूर केल्याचे निदर्शनास आल्यास कोणतीही पुर्वसूचना न देता त्याची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल व याबाबत प्राधिकरणाचा निर्णय अंतिम राहील.

८. अपूर्ण / चुकीची माहिती असलेले अर्ज नामंजूर करण्याचे अधिकार सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नाशिक यांना राहतील.

**<u>अर्ज सादर करण्याचा पत्ता</u>**

**सचिव,**
**जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,नाशिक**
**विधी सेवा सदन,**
**जिल्हा व सत्र न्यायालय परिसर,**
**नाशिक- ४२२००१**

---

दिनांक: ०४ ऑगस्ट २०२५
ठिकाण : नाशिक

**सचिव,**
**जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,नाशिक.**

# <u>लेखापाल पदासाठी अर्जाचा नमुना</u>

प्रति,

मा------------------------------------

--------------------------------------

विषय- लेखापाल पदासाठी अर्ज

महोदय,

मी, खाली स्वाक्षरी करणारा/करणारी आपल्या कार्यालयामध्ये प्रसिद्ध झालेल्या लेखापाल पदासाठी अर्ज करीत आहे. सदर पदासाठी आवश्यक सर्व पात्रता मी धारण करीत आहे. माझी वैयक्तिक माहिती खालीलप्रमाणे आहे.

1- पूर्ण नाव - ---------------------------------------------------------------------------------

2- वडिलांचे/पतीचे नाव ---------------------------------------------------------------------------

3- जन्मतारीख- / /

4- लिंग- पुरुष / स्त्री- ----------------------------------------

5- पत्ता- ----------------------------------------------------------------------------------------

---

6- मोबाईल नंबर- ------------------------------

7- ईमेल आयडी- ------------------------------

8- शैक्षणीक पात्रता- ------------------------

9- अनुभव -वर्षे - ------ महिने, संस्थेचे नाव व पद, ----------------------------

**<u>मी, सोबत आवश्यक कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडत आहे.</u>**

1- शैक्षणिक प्रमाणपत्रे

2- अनुभव प्रमाणपत्र

3- आधार कार्ड ओळखपत्र

4- पासपोर्ट साईज फोटो

5- इतर संबंधित कागदपत्रे

आपण मला संधी दिल्यास मी प्रामाणिकपणे व मेहनतीने काम करेन याची मी खात्री देतो/देते.

आपला/आपली विश्वासू.

स्वाक्षरी- ---------------------------

नाव - --------------------------------

दिनांक

ठिकाण-